# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.02.2025** **वारः मंगळवार**

---

१. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पीएम किसान योजनेच्या १९व्या हप्त्याचं वितरण

२. राज्यातील शेतकऱ्यांना आता दरवर्षी १५ हजार रुपयांचा सन्मान निधी मिळणार - मुख्यमंत्र्यांची घोषणा

३. महाराष्ट्र लवकरच भारताच्या एआय आणि तंत्रज्ञान क्रांतीचं नेतृत्व करेल, मुख्यमंत्र्यांचा विश्वास

४. शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून राज्यातल्या बाजार समित्या सक्षम करण्याचं पणन मंत्र्यांचं आश्वासन

आणि

५. आंबेडकरी चळवळीतले ज्येष्ठ गीतकार, लोकशाहीर प्रभाकर पोखरीकर यांचं निधन

**<u>पीएमकिसान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल बिहारमधल्या भागलपूर इथून पीएम किसान योजनेचा १९वा हप्ता वितरीत करण्यात आला. यावेळी एकंदर २२ हजार ७०० कोटी रुपये ९ कोटी ८० लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले. पीएम किसान योजनेला सहा वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**<u>पीएमकिसानमुख्यमंत्री</u>**

राज्यातल्या शेतकऱ्यांना पंतप्रधान कृषी सन्मान योजनेअंतर्गत 6 हजार रुपये मिळत आहेत. यामध्ये राज्य शासनाच्या नमो कृषी सन्मान योजनेअंतर्गत 6 हजार रुपये आणि यात राज्य शासनातर्फे आणखी 3 हजार रुपये वाढ करून शेतकऱ्यांच्या खात्यात आता दरवर्षी 15 हजार रुपये जमा होतील अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. नागपूर इथं मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पीएम किसान योजनेचा १९वा हप्ता वितरित करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

पुण्यात केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या आणि सोलापुरात केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

**मुख्यमंत्रीएआय**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून राज्य शासन प्रशासकीय कामकाज आणि अर्थव्यवस्थेला गती देत आहे; महाराष्ट्र लवकरच देशाच्या एआय आणि तंत्रज्ञान क्रांतीचं नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. नॅसकॉम तंत्रज्ञान आणि नेतृत्व परिषदेत ते काल मुंबईत बोलत होते.

देशातली ६० टक्के डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. २०३०पर्यंत राज्यातली ५० टक्के वीजनिर्मिती हरित ऊर्जेवर आधारित असेल असं फडणवीस म्हणाले. शेतीमध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीनं शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक इथं जीसीसी पार्क विकसित करणार असून उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी यासाठी आपल्या कल्पना आणि योगदान द्यावं, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**राज्यपाल**

तंत्रज्ञानात होणाऱ्या प्रगतीमुळे मुक्त शिक्षणाचा मार्ग मोठ्या प्रमाणात विस्तारत आहे. जगभरातील मुक्त शिक्षण प्रणालीशी समन्वय साधल्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणाची गती निश्चितच वाढेल, असा विश्वास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला. या विद्यापीठाच्या तिसाव्या पदवीप्रदान सोहोळ्यात ते काल नाशिक इथं बोलत होते. २०३६पर्यंत उच्च शिक्षणात ५० टक्के नोंदणी साध्य करण्याचं स्वप्न मुक्त आणि दूरस्थ शिक्षण क्षमतेचा वापर करूनच साकारता येईल असं राज्यपाल म्हणाले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते विविध विद्याशाखेत सुवर्ण पदक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

दरम्यान, नाशिकमधल्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २४वा दीक्षांत समारंभही राज्यपालांच्या उपस्थितीत पार पडला. डॉक्टरांनी मानवता धर्म  जोपासावा असं आवाहन राज्यपालांनी यावेळी केलं. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कुलगुरु डॉक्टर डॉ. माधुरी कानिटकर, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. गंगाधर आदी मान्यवर उपस्थित होते.

**<u>जयकुमाररावल</u>**

शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून राज्यातल्या बाजार समित्या सक्षम करण्याचं आश्वासन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी काल दिलं. पुण्यात झालेल्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेत ते बोलत होते. जागतिक बाजार समितीच्या धर्तीवर राज्याची पणन व्यवस्था स्पर्धात्मक करणं आवश्यक असल्याचं ते म्हणाले. राज्यात काही आदिवासी भागात आणि 69 तालुक्यांमध्ये नव्यानं बाजार समिती निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी भविष्यात अधिकाधिक पारदर्शकता ठेवून आणि शेतकऱ्यांना आधुनिक सुविधा पुरवून आकर्षित करावं असं रावल म्हणाले.

राज्यातल्या सर्व बाजार समित्यांचे सभापती, उपसभापती, संचालक आणि सचिव तसंच स्थानिक आमदार आणि शासकीय अधिकारी परिषदेला उपस्थित होते.

**<u>शालेयवाहतूक</u>**

शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी बससाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून नियमावली निश्चित करण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. परिवहन विभागाच्या बैठकीदरम्यान त्यांनी ही माहिती दिली. ही नियमावली निश्चित करण्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली आहे. पुढच्या एक महिन्यात या संदर्भातला अहवाल सादर करण्याच्या सूचना या समितीला देण्यात आल्याचं सरनाईक यांनी सांगितलं.

**<u>अमितेशकुमार</u>**

पुणे शहरात एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन यंत्रणा राबवण्यात येणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी काल दिली. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीनं आयोजित वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते. या यंत्रणेबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले,

**<u>कोकाटे-</u>**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना झालेल्या शिक्षेला नाशिक जिल्हा न्यायालयानं स्थगिती दिली आहे. सरकारी वकील आज युक्तीवाद करणार आहेत. त्यानंतर पुढील निर्णय होणार असल्याचं कोकाटे यांचे वकील अविनाश भिडे यांनी सांगितलं.

**<u>ग्रंथोत्सव</u>**

ग्रंथ प्रेमींना एकाच ठिकाणी विविध ग्रंथ प्राप्त व्हावेत, प्रकाशक आणि ग्रंथ विक्रेत्यांना ग्रंथ विक्रीसाठी एकाच ठिकाणी आवश्यक ती सुविधा उपलब्ध व्हावी या उद्देशानं सांगलीत ग्रंथोत्सव आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयानं आयोजित केलेल्या या दोन दिवसांच्या ग्रंथोत्सवाचं उद्घाटन उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते काल झालं.  राज्यभरात वाचन चळवळ वृद्धिंगत करण्यासाठी शासन स्तरावरून सर्वतोपरी प्रयत्न करून पाठबळ देऊ, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

**<u>गळीतहंगाम</u>**

सोलापूर जिल्ह्यात ऊसाअभावी यंदाचा गळीत हंगाम लवकरच आटोपता घ्यावा लागला आहे. साखर कारखाने पूर्ण क्षमतेनं चालवण्यासाठी ऊस उपलब्ध होत नसल्यानं जिल्ह्यातल्या ३३ पैकी २९ साखर कारखान्यांना गाळप वेळेपूर्वीच थांबवावं लागलं.

**<u>निधन</u>**

आंबेडकरी चळवळीतले ज्येष्ठ गीतकार, लोकशाहीर प्रभाकर पोखरीकर यांचं काल अल्प आजारानं निधन झालं. ते ६० वर्षांचे होते. ठाण्यात कळवा इथल्या

रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.  प्रभाकर पोखरीकर मूळचे पुणे जिल्ह्यातल्या आंबेगाव तालुक्यातल्या पोखरी गावचे होते. “जिवाला जीवाचं दान” हा त्यांचा अल्बम, तसंच “छाती ठोकून सांगू जगाला” हे त्यांचं गाणं विशेष गाजलं.

पोखरीकर यांच्या निधनानं आंबेडकरी चळवळीची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे, अशा शब्दांत केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या २४ तासात कोकणात तुरळक ठिकाणी हवामान उष्ण आणि दमट असेल तर उर्वरित राज्यात हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.